## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५३०१


क्र. रातुमनावि/विद्या/१७/१०४ दिनांक २८ जुन, २०१७

# : अधिसूचना :

मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार सर्व संबंधिताच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ अंतर्गत विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या एकुण ४ विद्याशाखे नुसार (Faculty of Science & Technology, Commerce and Management, Humanities & Inter Disciplinary Studies) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या आयोजनामध्ये एकसुत्रता आणण्याकरीता निर्देश क्रमांक १३/२०१७ दिनांक ०६ जुन,२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

निर्देश क्रमांक १३/२०१७ नुसार सत्र २०१७–१८ पासून मानव्यशास्त्र विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या पदवि व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील **इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भुगोल, गृहअर्थशास्त्र, समाजकार्य, बुध्दीस्ट स्टडीज, गांधी विचारधारा, ग्रामीण सेवा, लोक प्रशासन, प्रवास व पर्यटन, डॉ. आंबेडकर विचारधारा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा, प्राचिन भारतीय इतिहास सांस्कृतीक आणि पुरातत्व, मास कम्युनिकेशन, ग्रंथालय व माहितीशास्त्र, फॅशन डिझाईन, मिलीट्री सायन्स व ग्रामिन सेवा** या विषयांच्या अभ्यासक्रमिकेत व परिक्षा योजनेत सबंधी विषयाच्या विशेष कार्य समितीच्या मा.समन्वयकांनी किरकोळ सुधारणा करून मा.कुलगुरूंना शिफारशीत केलेल्या आहेत. सदर शिफारशी मा. कुलगुरू महोदयांनी संबधीत अभ्यासमंडळ, मानव्यशास्त्र(समाजविज्ञान) विद्याशाखा, विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६च्या कलम १२(७) अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

तसेच निर्देश क्रमांक १३/२०१७ (१५) (V) नुसार ४२ पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या Foundation विषयाची यादी परिशिष्ठ – अ (Appendix-A) मध्ये नमुद केलेली आहे. या व्यतीरीक्त कोणत्याही अभ्यासक्रमातील Foundation विषय विद्यार्थ्यांना घेता येणार नाही. कृपया याची विद्यार्थी व संबंधीतांनी नोंद घ्यावी ही विनंती.

(टिप:–उपरोक्त अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमिका व परीक्षा योजनाा विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.)

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव